## 1.2 भारतीय राज्यघटनेचा स्त्रोत आणि तत्वज्ञानाचा आधार: (Source and Philosophical Basis of Indian Constitution)

आधुनिक शासन संस्था ही लोककल्याणासाठी कार्य करणारी राजकीय यंत्रणा असल्याचे मानले जाते त्यासाठी प्रयत्न अधिकार व कार्य असलेले एक विशिष्ट स्वरूपाचे सरकार निर्माण करण्याची गरज निर्माण होते विविध स्तरावरील शासनांमधील संबंध व शासन आणि नागरिक यामधील संबंध या दोन प्रमुख बाबींशी राज्यघटना संबंधित असते.भारताचे संविधान म्हणजे या देशाच्या जनतेने ब्रिटिश वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी दिलेल्या स्वातंत्र्यलढ्याचे फलित होय. आधुनिक शिक्षण, प्रशासकीय ऐक्य, सामाजिक-धार्मिक सुधारणा इ. घटकांमुळे भारतात प्रबोधनाचा प्रवाह सुरू झाला. त्यातून राष्ट्रवादी विचारसरणी विकसित झाली. राष्ट्रवादी भावनेच्या उत्कर्षातून समाजाचे राजकीय भान विस्तारत गेले. परिणामी, जबाबदार शासन, लोकप्रातिनिधिक शासन, स्वराज्य आणि अंतिमतः पूर्ण स्वराज्यासाठी स्वातंत्र्य लढा उभारण्यात आला. या प्रक्रियेतूनच भारताचे संविधान सिद्ध झाले.

अरुण थिरुवेंगडम यांनी या प्रक्रियेवर भाष्य करताना पुढील महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. त्यांच्या मते, संविधान निर्मिती प्रक्रियेत दोन वरकरणी अंतर्विरोधी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. एका बाजूला साम्राज्यवादी आणि शोषणात्मक ध्येय साध्य करण्यासाठी उत्क्रांत झालेल्या वसाहतवादी कारभारप्रक्रियेला जुळवून घेणे आणि दुसऱ्या बाजूला नव्या घटनात्मक व्यवस्थेत समतावादी आणि लोकशाही जाणीव निर्माण करणे, ही ती प्रक्रिया होय.

स्वातंत्र्य चळवळीने राष्ट्रवादाची उभारणी करताना ज्या मानवतावादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही व पुरोगामी मूल्यांचा स्वीकार केला त्या मूल्य व आदर्शाना संविधानाद्वारे शब्दबद्ध करण्यात आले आहे. भारतीय घटनाकारांनी राष्ट्रीय चळवळीतील आदर्श आणि अन्य देशांच्या राज्यघटनेतील तत्त्वे यांचा मिलाफ (भारतीय राज्यघटनेमध्ये) घडवून आणलेला आहे. ब्रिटिश राजवटीतील विविध कायदे, राजकीय आणि प्रशासकीय व्यवहार, भारतीय समाजाने या वसाहतवादी राजवटीस दिलेला प्रतिसाद, भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतून उद्धृत झालेली तत्त्वे, विविध देशांतील घटनात्मक तरतुदींचा प्रभाव इ. अनेक घटकांच्या संयुक्त प्रभावातून ही राज्यघटना साकारली. अनेक अंगाने वैविध्यपूर्ण असणाऱ्या भारतीय समाजाला एक नवी ओळख देणाऱ्या राज्यघटनेचे स्रोत पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

- **राज्यघटनेचे स्रोत :**
- **(Sources of the Constitution) :**

**पुढील प्रमाणे भारतीय राज्यघटनेचे स्त्रोत विविध प्रकारे स्पष्ट करता येतील.**

**(अ) तत्त्ववैचारिक स्त्रोत :**

**(Theoretical sources) :**

**1)भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा वैचारिक वारसा:**

**(Ideological Legacy of Indian Freedom Struggle)**

भारतीय राज्यघटनेचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातून पुढे आलेला संमिश्र स्वरूपाचा वैचारिक वारसा हा  तत्त्ववैचारिक स्रोत मानता येतो. आधुनिक भारतीय इतिहासाचे अभ्यासक बिपन चंद्रा यांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय स्वातंत्र्यलढा म्हणजे भिन्न स्वरूपाच्या वैचारिक प्रवाहांचे एक गाठोडेच होते. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेची निर्मिती करण्यासाठी स्थापन केलेल्या घटना समितीने उपरोक्त नमूद केलेल्या बहुल-वैचारिक चौकटीच्या संदर्भातच राज्यघटना तयार केली हे लक्षात येते. भावी राज्याचे स्वरूप व भूमिका, शासनप्रकार यांविषयी घटना समितीतील विवाद अभ्यासल्यास ही बाब ठळकपणे लक्षात येते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात एका बाजूला राजा राममोहन रॉय, न्या. रानडे, लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या नेत्यांचा उदार, नेमस्त प्रवाह जसा दिसतो तसाच या उदारमतवादी व्यापक प्रवाहातच म. फुले, आगरकरांप्रमाणे मूलग्राही स्वरूपाची सामाजिक-धार्मिक सुधारणा सांगणाराही महत्त्वपूर्ण अंतःप्रवाह दिसतो. महात्मा फुल्यांनी त्याही पुढे जाऊन स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या दृष्टिकोनातून तत्कालीन उच्चजातीय, उच्चशिक्षितांच्या सुधारणावादातील मर्यादांवर नेमके बोट ठेवले आणि काँग्रेसप्रणित राष्ट्रवादाची मर्यादा पुढे आणली. छत्रपती शाहू महाराज आणि विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माची चिकित्सा करत हिंदू धर्म आणि जातिसंस्थेचा सेंद्रिय संबंध उघड केला आणि भारतीय राष्ट्रवाद व पुढे लोकशाही शासनास सामाजिक परिमाण प्राप्त करून दिले. दुसऱ्या बाजूला स्वामी दयानंद सरस्वती, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक इ. नेते-सुधारक यांचा समावेश असणारा सामाजिक पुनरूज्जीवनवादी प्रवाह निर्माण झाला. या प्रवाहाने भारतीय परंपरांचे गौरवीकरण करून ब्रिटिशांद्वारे नव्हे तर एतद्देशीयांच्या पुढाकारातून भावी भारताची जडणघडण

केली जावी असा विचार मांडला. स्वाभाविकच या प्रवाशा दृष्टिकोनातून जोरदार टीका केली.

म. गांधींच्या विचार व व्यवहारातून तिसरा प्रवाह आकारास आला. यात भारतीय परंपरेला दोषमूलक मानून आधुनिकतेच अनुकरण करणे अथवा परंपरेचे गौरवीकरण करून आधुनिकतेला पूर्णपणे नकार देणे अशी टोकाची भूमिका नव्हती. आधुनिक भारतीय राजकीय विचाराचे भाष्यकार थॉमस पँथम यांच्या मते, गांधींच्या विचारात परंपरा व आधुनिकता यामध्ये सर्जनशील मेळ घालण्याचा प्रयत्न सभ्यतेची मीमांसा जशी दिसते तसेच धर्म व व्यवहार यांचा परंपरेने लावलेला अर्थ नाकारून तिला आधुनिक आशय देणारी परखड, आधुनिक दृष्टीही दिसून येते.

20 व्या शतकात डावा आणि समाजवादी प्रवाहही ठळकपणे पुढे येतो. एका बाजूला कार्ल मार्क्सच्या विचाराने प्रेरित झालेली तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय काँग्रेस अंतर्गत कार्यरत हेरॉल्ड लास्कींच्या प्रभावातून येणारी फेबियन स्वरूपाची समाजवादी धाराही निदर्शनास येते. याखेरीज आदिवासी, शेतकरी, कामगार, क्रांतिकारक (उजवे, डावे), स्थानिक लोक यांच्या चळवळी आणि स्त्रियांच्या संघटना इ. घटकांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रवाहाबाहेर कार्यरत राहून राष्ट्रीय चळवळीच्या विचार-व्यवहारास महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्वातंत्र्यलढ्यातून पुढे आलेल्या या भित्र वैचारिक प्रवाहाच्या प्रभावातून भारतीय राज्यघटनेची जडणघडण आणि निर्मिती झाली.

स्वातंत्र्य लढ्यातून आकारास आलेल्या उपरोक्त संमिश्र वैचारिक बैठकीचे प्रतिबिंब उद्दिष्टांच्या ठरावात उमटल्याचे दिसून येते. 13 डिसेंबर 1946 रोजी हा 'उद्दिष्टांचा ठराव' मांडण्यात आला. पं. जवाहरलाल नेहरूंनी ठरावाचा मसुदा तयार केला होता. त्यात म्हटले होते की, भारतीय राज्यसंघाची

एकसंधता टिकवून ठेवण्यासाठी, तिची अधिसत्ता आणि सत्ता भारतीय जनतेकडून घेतलेली आहे. ठरावाने घोषित केले की, सर्व नागरिकांना... न्याय, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय; दर्जा, संधी आणि कायद्यासमोर समानता; विचार, उच्चार, विश्वास, श्रद्धा, उपासना, संघटन आणि कृती यांचे स्वातंत्र्य कायदा आणि सार्वजनिक नीतिमत्तेच्या अधीन राहून दिले जाईल. अल्पसंख्याक, शोषित आणि मागासवर्ग, अविकसित आणि आदिवासी प्रदेशांच्या पुरेशा संरक्षणासाठीचे आवाहन या ठराबाद्वारे करण्यात आले.

## (2) संविधान निर्मात्यांची वैचारिक अभिमुखता:

## (Ideological Orientation of the Constitution Maker):

ऑनव्हिल ऑस्टिन यांनी 'द इंडियन कॉन्स्टिट्यूशन : कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन' (1966) या ग्रंथात संविधान निर्मात्यांच्या वैचारिक अभिमुखतेबाबत काही पैलू स्पष्ट केले आहेत. त्यांच्या मते, सामाजिक क्रांती तसेच राष्ट्रीय बांधणी शक्य करणाऱ्या राज्यघटनेची निर्मिती करणे हे घटना समितीचे मिशन होते.सैद्धांतिकदृष्ट्या पाहिल्यास असे दिसते की, घटना समितीपुढे बरेच पर्याय उपलब्ध होते. उदारमतवादी लोकशाही प्रारूपाबरोबरच युरोपीय एकाधिकारशाही, राजेशाही आणि सोव्हिएत व्यवस्था असे पर्याय उपलब्ध होते. याशिवाय गांधींनी मांडलेला 'पंचायत आणि विकेंद्रित शासन' हा पर्यायदेखील उपलब्ध होता. तथापि, घटनाकारांची लोकशाही तत्त्वांप्रति कमालीची कटिबद्धता असल्यामुळे अन्य पर्याय आपसूकच गैरलागू ठरले.

ऑस्टिन यांच्या मते, घटना समितीने गांधीवादी प्रारूपाचा स्वीकार न करता 'संसदीय संघराज्यीय' लोकशाहीचा पर्याय स्वीकारला त्यामागे पुढील कारणे होती. पहिले कारण, काँग्रेस ही पूर्णार्थाने कधीही गांधीवादी नव्हती. याउलट, संसदीय शासनव्यवस्थेवर असलेला विश्वास हा सार्वत्रिक स्वरूपाचा होता. साम्यवादी पक्षासह विविध राजकीय पक्षांनी तयार केलेल्या राज्यघटनांमध्ये संसदीय आणि केंद्रीकृत शासनसंस्थेची आवश्यकता प्रतिपादित केली होती. भारतीयांना वसाहत काळापासून प्रातिनिधिक शासनव्यवस्थेचा यशस्वी अनुभव (घटनानिर्मितीच्या वेळेस समितीतील बहुसंख्य सदस्य तत्कालीन संसदीय शासनाचा राज्यकारभारही चालवित होते) असल्याने त्यांनी संसदीय राज्यघटनेला प्राधान्य देणे स्वाभाविक होते. याशिवाय लोकशाहीने नाझी व फॅसिस्ट शक्तींवर मिळविलेला ऐतिहासिक विजय आणि 1945 नंतर पुढे आलेली ब्रिटिश आणि अमेरिकी लोकशाहीची आश्वासक स्थिती यांमुळेदेखील घटनाकारांची 'उदारमतवादी लोकशाही परंपरेप्रति' वैचारिक बांधिलकी दृढ झालेली दिसते.

दुसरे, घटना समितीच्या बहुसंख्य सदस्यांच्या समाजवादाशी असलेल्या वैचारिक आणि भावनिक बांधिलकीमुळेदेखील समितीचा संसदीय शासनव्यवस्थेवरील विश्वास दृढ झाला. अर्थात हे समाजवादी सदस्य मार्क्सवादी, गांधीवादी समाजवादी, पुराणमतवादी भांडवलवादी अशा वेगवेगळ्या वैचारिक छटांनी प्रभावित होते. तथापि, समितीतील हे सर्वच सदस्य फेबियन आणि लास्कीवादी होते, कारण 'समाजवाद म्हणजे सामाजिक पुनरूत्थानासाठी हाती घ्यावयाचे दैनंदिन राजकारण आहे तर लोकशाही राज्यघटना आर्थिक समतेच्या उद्दिष्टाशी अभिन्नपणे जोडल्या गेल्या आहेत', या भूमिकेवर त्यांचा दृढविश्वास होता. परिणामी, घटना समितीने आपल्या ध्येयाला अनुसरून मानवतावादी आणि सामाजिक लोकशाही विचाराची काही तंत्रे समाविष्ट असणाऱ्या राज्यघटनेची

निर्मिती केली.तिसरे, घटना समितीने थेट निवडणुका आणि केंद्रीकृत (Centralized) स्वरूपाच्या शासनरचनेचे प्रारूप स्वीकारले. यामागे एका बाजूला गांधीप्रणित समाज दुर्गुणाच्या निदानास दिलेला नकार आणि त्यांनी सुचवलेल्या उपायांविषयीची साशंकता तर दुसऱ्या बाजूला कालपरत्वे संसदीय शासनव्यवस्थेस दिलेला अग्रक्रम ही प्रमुख कारणे होती. तथापि, याखेरीज काही महत्त्वपूर्ण तात्कालिक कारणेदेखील जबाबदार ठरली. पं. नेहरूंनी गांधींशी केलेल्या पत्रव्यवहारातून (ऑक्टो. 1945) ही तात्कालिक कारणे स्पष्ट होतात. नेहरूंच्या मते, "राज्यघटना आणि शासन प्रकारासंबंधी प्रश्न विचारात घेतांना वर्तमान स्थितीतील 'तथ्ये', 'शक्ती' आणि 'मानव संसाधन' याकडे दुर्लक्ष करता येत नाही."

. 1946 मधील मद्रास प्रांतातील दुष्काळसदृश्य स्थिती; राष्ट्रीय पातळीवर अन्नधान्याचा अपुरा साठा, भाववाढ आणि अपुरे उत्पादन व अतिरिक्त उत्पादन असलेल्या प्रदेशांमधील हितसंबंधात्मक संघर्ष या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाकडून तातडीचे उपाय योजने गरजेचे होते. बॅ. जिन्हांनी 'थेट कृती दिन' जाहीर केल्यानंतर उसळलेली जमातीय हिंसा, संस्थांनिकांचे विलीनीकरण आणि तेलंगणातील साम्यबादी उठाव यामुळे अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न तीव्र बनला होता. दुसऱ्या बाजूला ईशान्येकडील प्रदेशांचे संरक्षण आणि काश्मीरमधील पाक पुरस्कृत घुसखोरी (ऑक्टो. 1947) यांमुळे बाह्य सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला. अशा स्थितीत, 'स्थैय' आणि 'ऐक्य' या चिंतेचा घटना निर्मिती प्रक्रियेवर परिणाम होणे अटळ होते. त्याचप्रमाणे 'आर्थिक प्रगतीच्या उद्दिष्टामुळेदेखील प्रबळ आणि केंद्रकारी शासनाची निर्मिती करणाऱ्या संविधानास अग्रक्रम देण्यात आला.

शेवटचे कारण, प्रौढ मताधिकाराद्वारे हजारो वर्षे समाजाच्या मुख्य प्रवाहाबाहेर ढकललेल्या समाजघटकांना समान राजकीय हक्क प्रदान करणे ही सामाजिक क्रांतीची एक पूर्वअट मानली गेली. प्रौढ मताधिकारावर आधारित प्रत्यक्ष

निवडणुका ही स्वातंत्र्याची एक अनिवार्य अट होती आणि याबाबत एकंदर स्वातंत्र्य चळवळ वचनबद्ध होती. थोडक्यात, घटना समितीतील सदस्यांचा संसदीय लोकशाहीवरील विश्वास आणि तिचा स्वीकार ही केवळ 'ऐतिहासिक अपरिहार्यता' नव्हती तर ते जवळपास शतकभराच्या संघर्ष आणि अपेक्षांच्या संचयातून निर्माण झालेले समर्पित 'चैतन्य' होते. प्रा. डब्ल्यू. एच. मॉरिस जॉन्स यांनी या तथ्याचे वर्णन 'भारताचे राजकीय आश्चर्य' (India's Political Miracle) या शब्दात केले आहे.

घटना समितीचे एक सदस्य अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्या मते, सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाने सर्वसामान्य माणसांच्या क्षमतांवरच विश्वास दर्शवला. के. एम. पणिक्कर यांच्या मते प्रौढ मताधिकाराचे परिणाम राजकीय क्षेत्रापुरतेच मर्यादित नव्हते तर त्याचे सामाजिक आयामदेखील महत्त्वाचे होते. कारण ज्या घटकांना सार्वजनिक जीवनात कसलाच अधिकार नव्हता, त्यांना आता सार्वजनिक जीवनावर प्रभाव पाडण्याची राजकीय सत्ता प्राप्त झाली.

**ब) संरचनात्मक स्रोत:**

**(structural sources) :**

भारतीय राज्यघटनेचे संरचनात्मक स्रोत हे पुढील प्रमाणे मुद्द्यांद्वारे सांगता येतील.

*** 1935 चा भारत सरकार कायदा :**

**(Government of India Act of 1935):**

'1935 च्या भारत सरकार कायद्या'स भारतीय घटनेचा संरचनात्मक स्रोत मानले जाते. राज्यघटनेच्या संघराज्यव्यापी पायाभूत चौकट या कायद्यातूनच स्वीकाल्याचे निरीक्षण अनेक विश्लेषकांनी नोंदवले आहे. सुभाष कश्यप यांनी व्रताच् घटनेने 1935 च्या भारत सरकार कायद्यातील सुमारे 75% एवढा भाग स्वीकृत केला', असे निरीक्षण नोंदवले आहे.

वस्तुतः कंपनी आणि त्यानंतरच्या राजपदाच्या सत्ताकाळात जी वैधानिक प्रशासकीय व्यवस्था उदयाला आली त्याचा भारतीय राज्यघटनेच्या संरचनेची पूर्वपीठिका म्हणून विचार केला जातो. संसदीय शासनपद्धती आणि संघराज्य या दोन्ही व्यवस्थांचा वसाहतवादी व्यवस्थेत मर्यादित रूपात स्वीकार करण्यात आला. त्यातून राज्यघटनेच्या संरचनात्मक पायाभरणीस साहाय्य मिळाले.

### (क) इतर राज्यघटनांचा प्रभाव:

### (Effect of other constitutions):

घटनाकारांनी इतर राज्यघटनांच्या प्रभावातून काही तत्त्वे स्वीकारली. अमेरिकी राज्यघटनेतील हकांच्या सनदेवरून (बिल ऑफ राईटस्) भाग तीनमधील मूलभूत हक्क घेण्याची प्रेरणा मिळाली. चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्त्वे आयरिश राज्यघटनेवरून स्वीकारली आहेत. संसदीय शासनपद्धती (कॅबिनेट शासनाची तत्त्वे आणि कार्यकारीमंडळ व कायदेमंडळ यांच्यातील संबंध) मोठ्या प्रमाणात ब्रिटिश अनुभवांवरून घेतलेली आहे. प्रभावी केंद्राचे प्रारूप कॅनडाच्या राज्यघटनेवरून घेतलेले आहे. सातव्या परिशिष्टातील विस्तृत समवर्ती सूचीचे प्रारूप ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेवरून स्वीकारले आहे. त्याचबरोबर व्यापार-उदीम आणि दळणवळण यांची तरतूद राज्यघटनेच्या 13 व्या भागात केली आहे.

घटनाकारांनी विविध देशांच्या राज्यघटनेतील सर्वोत्तम अशा तरतुदींचा स्वीकार केलेला आहे आणि याबाबतचे अनुरूप असे स्पष्टीकरण घटना समितीमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केले. घटना समितीचे सदस्य मौलाना हसरत मोहनी आणि सेठ दामोदर स्वरूप या दोहोंनी भारतीय घटनेचा मसुदा म्हणजे 'उसनवारी' आहे अशी टीका केली होती. यासंदर्भात डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते की, "जगाच्या इतिहासात या क्षणाला तयार करण्यात आलेल्या कोणत्या राज्यघटनेमध्ये नावीन्य आहे, असा प्रश्न कोणालाही उपस्थित करायला आवडेल. जगातील पहिल्या लिखित राज्यघटनेला 100 वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. त्यानंतर जगभरातील अनेक राष्ट्रांनी आपल्या राज्यघटना लिखित स्वरूपात तयार केल्या आहेत... या सर्व तथ्यांच्या आधारे असे म्हणता येईल की, सर्व राज्यघटनांमधील प्रमुख तरतुदींमध्ये साम्य आढळेल. कोणतीही एखादी नवीन बाब असलीच तर ती म्हणजे संबंधित राज्यघटनेतील उणिवा दूर करण्याचे आणि तिला आपल्या राष्ट्राच्या गरजांनुरूप बनविण्याचा प्रयत्न होय."

भारतीय राज्यघटना ही शासनसंस्थेचा मूलभूत कायदा आहे.भारतीय राज्यघटना जगभरातील विविध राज्यघटनांतील तत्त्वांनी प्रभावित असली तरी इतर राज्यघटनांतील सर्वोत्तम तरतुदी एकत्रित करणे आणि संभाव्य अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करून आपल्या देशाच्या गरजांना आणि परिस्थितीला अनुरूप असे त्यात बदल करण्याचे घटनाकारांचे योगदान मान्य केले पाहिजे. घटनेतील कलमांचा आशय, त्यांची उपयुक्तता आणि गेली सात दशके सुरू असलेला तिचा व्यवहार यांतून अधोरेखित होणारी बाब म्हणजे, भारतीय घटनाकारांनी घटनात्मक मूल्ये, आदर्श आणि भारतीय समाजवास्तव यांची सांधेजोड करूनच या घटनेची निर्मिती

केली होती. डॉ. आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे घटनाकर्त्यांनी अन्य देशांच्या राज्यघटनांतील सर्वोत्तम भाग एकत्र केले. थोडक्यात, 'भारताची राज्यघटना ही एक सुंदर गोधडी (Beautiful Patchwork) आहे', हे निरीक्षण समर्पक ठरते. म्हणूनच भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी व लिखित राज्यघटना म्हणून ओळखल्या जाते.